Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred Journal*


**June 2021 Volume-11 Issue-16**

## *Sustainable Development Goals: Initiatives, Execution and Challenges*







**Chief Editor**
**Dr. R. V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)

**Guest Editor**
**Dr. Prof. H. B. Rathod**
Principal
Gramin (ACS) Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal), Tal. Mukhed

**Executive Editors**
Dr. V. T. Naik
Mr. B. C. Rathod

**Co- Editors**
Dr. D. K. Kendre
Mr. S. A. Jewale
Dr. U. D. Padamwar






**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

***1 June-2021 Volume-11 Issue-16***

***On***

## *Sustainable Development Goals: Initiatives, Execution and Challenges*

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**Chief Editor**

Dr. R. V. Bhole

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**Guest Editor**

Dr. Prof. H. B. Rathod

Principal

Gramin (ACS) Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal), Tal. Mukhed

**Executive Editors**

**Dr. V. T. Naik Mr. B. C. Rathod**

Co- Editors

**Dr. D. K. Kendre**
**Mr. S. A. Jewale**
**Dr. U. D. Padamwar**

Editorial Board

| | | | |
|---|---|---|---|
| Mr. Thorve A. B. | Prof. Zamapalwad S. S. | Prof. Kalyan G. S. | Dr. Kshirsagar S. G. |
| Shri. Dethe S. K. | Shri. Kalimath S. K. | Shri. Babarao S. | Mr. Kankute S R. |
| Prof. Shinde P. A.<br>Shri. Mathpati G. H. | Prof. Pawar S. K.<br>Shri. Patil S. S. | Sow. Itkapalle A. P.<br>Mr. Naik N. U | Dr. Gore S. Y. |

**Published by-** Principal, Dr. Prof. H. B. Rathod, Gramin (ACS) Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal), Tal. Mukhed

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani




| | | |
|---|---|---|
| 45 | [illegible] तालुका पर्जन्य विचलता- एक भौगोलिक अभ्यास<br>**श्री. हनुमंत शंकर हेळकर, प्रा. डॉ. डी. जी. शिंदे** | 177-1 |
| 46 | भारत में सतत विकास लक्ष्य-चुनोतीया एवं सम्भावनाये<br>**प्रो.विकास वर्मा** | 181-1 |
| 47 | अहमदपुर तालुक्यातील पाझर तलाव जलसिंचन स्त्रोताचा भौगोलिक अभ्यास<br>**प्रा डॉ.राठोड बी.एस** | 185-1 |
| 48 | कंधार तालुक्यातील ग्रामीण वस्तीतील सेवा केंद्राचा चिकित्सक अभ्यास<br>**केंद्रे गणपत गंगाधर, प्रा. डॉ. मानकरी एम. पी.** | 188-1 |
| 49 | भारतीय शेती व्यवसायात प्रधानमंत्री पिक विमा योजनेचे योगदान<br>**प्रा.डॉ.एम.डी.कच्छवे** | 192-1 |
| 50 | जागतिक लोकशाही निर्देशांक आणि भारत<br>**प्रा.डॉ.आंधळे वी.व्ही.** | 196-1 |
| 51 | सशस्त्र बलों में लैंगिक समानता : एक अध्ययन<br>**श्री. मंगेश भगवंतराव कुलकर्णी,प्रा. डॉ. सौ संपदा सुधाकरराव कुलकर्णी** | 200-2 |
| 52 | शाश्वत विकासाची ध्येये: संकल्पना आणि स्वरूप<br>**श्रद्धा मोहन पवार** | 203-2 |
| 53 | शाश्वत शेती संकल्पना: आव्हाने आणि संभावना<br>**प्रा. सुकुमार दत्ता पाटील प्रा. डॉ. एल. एच. पाटील** | 208-2 |
| 54` | उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा व तुळजापूर तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमधील अंतरण एक अभ्यास<br>**प्रा. सतिश डी. गावित प्रा. डॉ. मदन व्ही. सूर्यवंशी** | 212-2 |
| 55 | कोरोना परिप्रेक्षात भारतीय समाज व अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम<br>**प्रा. डॉ. झाकीरहुसेन हाकीम संदे** | 215-2 |
| 56 | भारतीय लोकसंख्या आणि शाश्वत विकास<br>**प्रा. शत्रुघ्न नामदेव लोहकरे** | 218-2 |
| 57 | लातूर जिल्ह्यातील यात्रा केंद्राच्या अभिक्षेत्रीय वितरणावर परिणाम करणाऱ्या घटकांचा भौगोलिक अभ्यास<br>**डॉ. केरबा कांबळे** | 222-2 |

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# जागतिक लोकशाही निर्देशांक आणि भारत

***प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही.***

*राज्यशास्त्र विभाग, कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ, जि.परभणी*

*email:- bvandhale@gmail.com*

**प्रस्तावना :-** सध्याचे युग हे तांत्रिक कुशलता व शास्त्रीयता यांचे आहे.आत्याधिक तांत्रिक पध्दतीचा परिणाम इतर सामाजिक शास्त्रावर सुध्दा पडला आहे.यामुळे कोणत्याही सामाजिक संकल्पनेचे मूल्यमापन वास्तविक होण्यावर भर दिला जात आहे.भौतिकशास्त्रातील तंतोतंतपणा व शास्त्रीयता सामाजिक संकल्पनामध्ये आनुण आज त्यांचे मूल्यमापन केले जात आहे.मग ते इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र असो किंवा राज्यशास्त्रीय संकल्पना असो.जागतिक मानव विकास निर्देशांकाच्या(World Human development index)आधारे जगातील विविध क्षेत्रातील मानव विकासाचे मोजमाप करण्यात येत आहे.आणि त्यानुसार देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकास अभ्यासला जात आहे.जागतिक मानव विकास निर्देशांकाप्रमाणेच सध्या जागतिक लोकशाही निर्देशांक (World democracy index)काढुन राजकीय व्यवस्थेचे सांख्यिक (Statistics) मूल्यमापन करण्यात येत आहे.जगातील देशांच्या राजकीय व्यवस्थांचे मूल्यमापन करून त्यांचे चार घटकांत वर्गीकरण केले जात आहे.यामुळे प्रत्येक देशाच्या राजकीय व्यवस्थेचे सैद्धांतिक व व्यावहारिक स्वरूप लक्षात येत आहे.कोणतीही राजकीय व्यवस्था चांगली अथवा वाईट असत नाही तर ती चालविणारे लोक कसे आहेत हे महत्वाचे असते.म्हणून इतर व्यवस्थाच्या मूल्यमापनाबरोबरच राजकीय व्यवस्थेचे जागतिक मूल्यमापन आज महत्वाचे वाटते.

लोकशाही म्हटले की, आपणाला अब्राहम लिंकन यांची लोकशाहीची व्याख्या आठवते.लोकांचे,लोकांनी ,लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय.परंतु लोकशाहीत येवढेच अपेक्षित नाही.तर लोकशाही आज जागतिक अधिमान्य शासन व्यवस्था म्हणून जशी पुढे आली आहे त्याप्रमाणे ती एक मानव जीवन पध्दती म्हणुन पुढे येत आहे.लोकशाही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे.म्हणून तिचे मूल्यमापन होणे योग्यच आहे.त्याशिवाय लोकशाही शासन प्रकार कितपत चांगला किंवा वाईट हे आपल्या लक्षात येणार नाही.

इंग्लंड हा देश लोकशाहीची जननी मानला जातो .आधुनिक लोकशाहीचा विकास इंग्लंडमध्ये झाला.पुढे अमेरिका,फ्रान्स, जपान, जर्मनी,दक्षिण आफ्रिका व भारत आदी देशांनी तिचा स्वीकार केला.आज जगातील बहुतांश देशांनी लोकशाही शासन प्रकार स्वीकारला आहे.भारताने संसदीय लोकशाही स्वीकारून आज जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून मान मिळविला आहे.भारताने लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारून आज जवळपास सत्तर वर्ष होत आहेत. या सत्तर वर्षाच्या कालखंड भारतीय लोकशाहीने कितपत विकास केला आहे ? याचे जागतिक पातळीवर मूल्यमापन करणे स्वाभाविक आहे.येवढेच नाही तर ते आपण होऊन करणे योग्य ठरेल. कारण की,भारतीय लोकशाहीने एका विसंगत परिस्थितीत वाटचाल सुरू केली.गरिबी,उपासमार, निरक्षरता याबरोबरच धार्मिकता,जातीयता,प्रांतवाद व घराणेशाही या समस्या होत्या.किंबहुना आजही काहीप्रमाणात त्या आहेत असे म्हणता येईल. जगाच्या तुलनेत भारतीय लोकशाहीची सध्याची वाटचाल कशी आहे हे जागतिक लोकशाही निर्देशांकाच्या आकडेवारीवरून काहीप्रमाणात लक्षांत येते.म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात जागतिक लोकशाही निर्देशांक आणि भारत याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**जागतिक लोकशाही निर्देशांक :-** सन 2006 सालापासून 'द इकॉनॉमिस्ट ' ने जगातील विविध देशांतील राजवटींचा जागतिक लोकशाही निर्देशांक जाहीर करण्यास सुरुवात केली.जगातील विविध क्षेत्रातील तीन हजार तज्ज्ञ व्यक्तीकडून हा अहवाल तयार करण्यात येतो.यात जगातील जवळपास 167 देशांच्या राजकीय व्यवस्थांचा अभ्यास केला आहे.हा अभ्यास करताना देशाची निवडणूक प्रक्रिया,सरकारी कामकाज, राजकीय भागीदारी,राजकीय संस्कृती व नागरी स्वातंत्र्य या घटकांचा आधार घेण्यात आला आहे.तसेच जागतिक लोकशाही निर्देशांक काढताना 0 ते 10

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

असे गुण दिले जातात. यामध्ये जो देश 0 ते 3 गुण प्राप्त करिल तो हुकुमशाही राजवट आसलेला देश असेल तर 4 ते 6 गुण मिळवणारा देश मिश्र राजवट आसलेला देश असेल, 6 ते 8 गुण प्राप्त करणारा देश दोष पुर्ण लोकशाही आसलेला देश मानला जाईल आणि 8 ते 10 गुण प्राप्त करणारा देश संपूर्ण लोकशाही आसणारा देश मानला जाईल. एकुणच सर्व देशांना गुण देऊन चार गटात विभागले आहे.

याशिवाय जागतिक लोकशाही निर्देशांक ठरविण्यासाठी साधारणपणे चार प्रश्न विचारण्यात आले.

1) देशातील निवडणूका स्वायत्तपणे व न्यायोचित होतात का?
2) देशातील मतदार सुरक्षित आहे का ?
3) विदेशी महासत्तांचा राष्ट्रीय सरकारवर अंमल आहे का ?
4) धोरणे लागू करण्याचे अधिकार सरकारी कर्मचाऱ्यांना ( Civil Servant) आहेत का ?

वरील प्रश्नांच्या आधारे जगातील राजकीय व्यवस्थांचे मूल्यमापन करण्याचे काम ' इकॉनॉमिस्ट इंटेलिजन्स युनिट ' ( EIU ) ने केले आहे.सन 2020 चा जागतिक लोकशाही निर्देशांक बनविताना 169 देशांचे चार गटात वर्गीकरण केले आहे.यात 23 देश संपूर्ण लोकशाही असलेले देश आहेत. 52 देश दोष पुर्ण लोकशाही आसलेले देश आहेत. 35 देश असे आहेत की तिथे मिश्र राजवट आहे.आणि 57 देश असे आहेत की तिथे हुकुमशाही राजवट आहे. यात नॉर्वे या देशाने संपूर्ण लोकशाही असण्याचे प्रथम स्थान मिळविले आहे.तर त्या खालोखाल आइसलॅंड,स्वीडन, न्यूझीलंड आणि कॅनडा यांचा क्रम आहे.तर अमेरिका ,ब्राझील, बेल्जियम, फ्रान्स व भारत या देशांनी दोष पुर्ण लोकशाही गटात स्थान पटकावले आहे.यावरून एक म्हणता येईल की ,जागतिक लोकशाही निर्देशांक ठरविताना लोकशाहीची परिपक्वता व विकास महत्त्वाचा आहे.

**भारतीय लोकशाही निर्देशांक:-** भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते.याचे कारण म्हणजे भारतीय लोकशाहीतील निवडणूकीत सहभागी होणारा मतदार हे आहे.भारताच्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत जवळपास नव्वद कोटी मतदार आहेत. त्यातील साठ ते सत्तर कोटी मतदार प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेत सहभाग घेतात.येवढ्या मोठ्या मतदारांकडून मतदान करून घेण्याचे कार्य भारतीय निवडणूक आयोग करतो आहे.भारतीय लोकशाहीचा इतिहास पाहता तो जेमतेम सत्तर वर्षाचा आहे.इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका या देशांच्या तुलनेत तो नगण्य असाच आहे.म्हणून तिचे जागतिक पातळीवर मूल्यमापन करायचे नाही किंवा ते तेवढे गांभीर्याने घ्यायचे नाही.पण जे देश आपल्या बरोबर लोकशाही शासन प्रकार स्वीकारून वाटचाल करीत आहेत त्यांच्या तुलनेत आपण आपल्या लोकशाहीत सुधारणा करणे आवश्यक आहे.परंतू आज हे होताना दिसत नाही.याऊलट भारतीय लोकशाही निर्देशांक वाढण्या ऐवजी तो खाली घसरत आहे.गेल्या तेरा वर्षांतील भारतीय लोकशाही निर्देशांकाचा आढावा घेतला तर ती बाब दिसून येते.प्रस्तुत निर्देशांक दर्शविणारा तक्ता पुढील प्रमाणे आहे.

**भारतीय लोकशाही निर्देशांक (Indian Democracy Index )**

| अनुक्रमांक | वर्ष | प्राप्त गुण |
|---|---|---|
| 1 | 2006 | 7.68 |
| 2 | 2008 | 7.8 |
| 3 | 2010 | 7.28 |
| 4 | 2011 | 7.3 |
| 5 | 2012 | 7.52 |
| 6 | 2013 | 7.69 |
| 7 | 2014 | 7.92 |
| 8 | 2015 | 7.74 |
| 9 | 2016 | 7.81 |
| 10 | 2017 | 7.23 |
| 11 | 2018 | 7.23 |
| 12 | 2019 | 6.9 |
| 13 | 2020 | 6.61 |

Late ... Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq. Sonpeth Dist. Parbhani

वरिल तक्त्यावरून असे दिसून येते की,सन 2019,2020 या वर्षांत भारतीय लोकशाही निर्देशांकात मोठी घसरण झाली आहे.विशेषतः भारतीय नागरिकांचे नागरी स्वातंत्र्य 0.75 वरून घसरून ते 0.59 पर्यंत खाली आले.अभिव्यक्ती स्वातंत्र्यात 0.87 वरून 0.51 येवढी घट झाली .भारताचा इलेक्टोरल डेमॉक्रशी इंडेक्स 89 व्या स्थानावर आहे.तर उदारमतवादी घटकाच्या सुचित 93 वे स्थान आहे.तसेच समतावादी सुचित 122 तर लोकशाही प्रक्रियेतील सहभाग या घटकात 105 वे स्थान मिळाले आहे.एकुणच या दोन वर्षांत भारतीय लोकशाही निर्देशांकात दहा अंकाची घसरण पहायला मिळते.सध्या भारत जागतिक लोकशाही निर्देशांकाच्या यादीत 53 व्या स्थानी आहे.

भारतीय लोकशाही निर्देशांक घसरण होण्यास सध्याच्या सरकारची ध्येय धोरणे कारणीभूत आहेत असे दिसून येते.यामध्ये भारतीय नागरिकत्व दुरुस्ती कायदा व एनआरसी वरून सुरुवात झालेले शाहीणबाग आंदोलन दडपणे, जम्मू काश्मीर मधील 370 कलम हाटविणे,तीन शेतकरी विरोधी कायदे,जेएनयू आंदोलन याशिवाय नागरी स्वातंत्र्यचा संकोच ,राजकीय नेतृत्वाचा वाढता हस्तक्षेप व राजकीय संस्कृतीचे नैतिक अधःपतन ही सर्व कारणीभूत आहेत. सध्या केंद्रात असलेले नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार लोकशाही मूल्य जोपासण्यात अपयशी ठरत आहे.सरकारच्या विरोधात आंदोलन करणे, घोषणा देणे किंवा टिका करणे हा प्रत्येक नागरीकाचा अधिकार आहे.परंतु प्रत्यक्षात सरकार प्रत्येक आंदोलन आपल्या सत्तेच्या जोरावर दाबु पहात आहे.मग ते शाहीनबाग आंदोलन, जेएनयू विद्यापीठातील विद्यार्थी आंदोलन आणि सध्या सूरू असलेले कृषि कायद्याच्या विरोधात चाललेले किसान आंदोलन यामध्ये सरकारची भूमिका दडशाहीची राहीली आहे.

आंदोलकांबरोबर चर्चा करण्याऐवजी सरकार वेळखाऊपणाची भूमिका घेत आहे.किंवा आंदोलकांवर देशद्रोहाचे आरोप करून त्यांना देश विरोधी ठरवत आहे.त्यांच्यावर देशद्रोहाचे खटले दाखल केले आहेत. फ्रीडम हाऊस या लोकशाही व मानवी हक्क यावर लक्ष ठेवणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय संस्थेने भारताचा दर्जा Free Country वरून बदलून Partly Free म्हणजे ' काही प्रमाणात स्वातंत्र्य देणारा देश ' असे म्हटले आहे .यावरून एक दिसून येते की, भारतीय लोकशाही आपल्या मूल्यांपासून कुठेतरी दुर जात आहे.आणि हे देशाच्या शाश्वत विकासाला मारक आहे.

**समारोप:-** कोणत्याही देशाचा शाश्वत विकास होण्यासाठी तेथील राजकीय व्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावत असते.कोणती राजकीय व्यवस्था चांगली हे महत्त्वाचे नसून ती राबविणारे लोक चांगले पाहिजेत. लोक जर आपल्या देशा प्रती प्रामाणिक, एकनिष्ठ व नैतिक असतील तर तो देश आपली सर्वांगीण प्रगती करतो.जपान, जर्मनी,ऑस्ट्रेलिया,न्यूझीलंड या देशानी जो विकास केला आहे त्याला तेथील परिपक्क लोकशाही कारणीभूत आहे.लोकशाही शासन व्यवस्था आज सर्वमान्य झाली आहे.म्हणून ती शुद्ध आहे असे होत नाही.लोकशाहीच्या वुरख्याआडून आपली एकाधिकारशाही निर्माण करणारे राजकारणी जोपर्यंत नष्ट केले जाणार नाहीत तोपर्यंत लोकशाही शासन व्यवस्था सक्षम होणार नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर घटना समितीला उद्देशून बोलताना म्हणाले होते की,जरी आपण एक मत एक मुल्य ही व्यवस्था स्वीकारली असली तरी जोपर्यंत देशातील सामाजिक आर्थिक विषमता संपणार नाही तोपर्यंत राजकीय लोकशाहीला काही महत्व असणार नाही.आज भारतीय संसदेत 2019 च्या लोकसभा निवडणुकीत 542 खासदारांपैकी 475 करोडपती आहेत तर 411 खासदार हे गंभीर गुन्हे दाखल असलेले आहेत त्यामुळे भारतीय लोकशाही अशा लोकप्रतिनिधींच्या हातात गेली आहे .तेव्हा अशा लोकप्रतिनिधींकडून नैतिक, सद्गुणी व संपूर्ण लोकशाही प्रस्थापित करण्याची अपेक्षा कशी करता येईल? तेव्हा भारतीय मतदारांनी योग्य लोक प्रतिनिधी निवडून दिले पाहिजेत. म्हणून येणाऱ्या काळात भारतात संपूर्ण लोकशाही राष्ट्राचा दर्जा मिळवायचा असेल तर तसे लोकप्रतिनिधी संसदेत पाठवावे लागतील.

**संदर्भ सूची:-**

1) भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने – अरूण सारथी
2) लोकशाही जिंदाबाद- सुहास पळशीकर
3) www.loksatta.com
4) www.bbc.com
5) www.wikipedia
6) www.maharashtrataimce.com

Late Ramesh Warpudkar ACS Col. Sonpeth Pin-4315 Tq.Sonpeth Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani